# राज्याचा हवामान, पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक ०४/१०/२०२१ अखेरचा खरीप हंगाम २०२१-२२ चा अंतिम साप्ताहिक अहवाल

❖ **हवामान** : राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश अंशत: ढगाळ होते.

कोंकण, नाशिक, औरंगाबाद व लातूर विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली. पुणे, कोल्हापूर, अमरावती व नागपूर विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

❖ **पर्जन्यमान (२०२१)** (अंतरीम)

दि.१ जून ते ०४ ऑक्टोंबर, २०२१ या कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस १०१३.४ मि.मी. असून दि.०४ ऑक्टोंबर, २०२१ पर्यंत १२१०.६ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ११९.५ टक्के पाऊस झाला. मागील वर्षी दि.०४.१०.२०२० अखेर १०९९.९ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या १०८.५ टक्के पाऊस झाला.

राज्यात दि.१ जून ते ०४ ऑक्टोंबर, २०२१ अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | --- |
| २ | २५ ते ५० % | ० | --- |
| ३ | ५० ते ७५ % | १ | नंदुरबार. |
| ४ | ७५ ते १०० % | ६ | नाशिक, पुणे, कोल्हापूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | २७ | ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, धुळे, जळगांव, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर. |

राज्यात दि.०४ ऑक्टोंबर, २०२१ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३५५ तालूक्यांपैकी २ तालूक्यांत २५ ते ५० %, १३ तालूक्यात ५० ते ७५ %, ६१ तालूक्यात ७५ ते १००% तर २७९ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

## राज्याचे सरासरी पर्जन्यमानाच्या तुलनेत प्रत्यक्ष पर्जन्यमानाचा तक्ता.



❖ **खरीप हंगाम-२०२१-२२ अंतिम पिक पेरणी :** राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र (ऊस वगळून) १४१.९८ लाख हेक्टर असून, दि.०१ ऑक्टोंबर, २०२१ अखेर १४२.८३ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०१%) पेरणी झाली आहे. तसेच राज्यात खरीप पिकांचे ऊस पिकासह सरासरी क्षेत्र १५१.३३ लाख हेक्टर असून, १४५.९० लाख हेक्टर क्षेत्रावर (९६%) पेरणी/ लागवड झाली आहे. मागील वर्षी दि.२८.०९.२०२० रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील ऊस पिकासह पेरणी क्षेत्र १४५.४२ लाख हे. (९६.०९%) तर ऊस पिक वगळून पेरणी क्षेत्र १४३.८२ लाख हे. (१०१.३०%) होते.

❖ **पिक परिस्थिती :**

- भाताच्या हळव्या जाती दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत तर निमगरव्या व गरव्या जाती फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहेत.
- सोयाबीन पिक शेंगा धरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीची कामे सुरु झाली आहेत.
- मूग व उडीद पिके काढणीची कामे पुर्णत्वास आहेत.
- कापूस पिक पाते, बोंडे लागणेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी पक्वतेच्या अवस्थेत आहे.
- भुईमूग पिक शेंगा भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून काही ठिकाणी काढणीची कामे सुरु झाली आहेत.
- ज्वारी व बाजरी पिके कणसे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे.
- मका पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे.
- पेरणी झालेली सुर्यफुल, तीळ व कारळे पिके फुलोरा ते शेंगा धरणेच्या अवस्थेत आहेत.

❖ **नैसर्गिक आपत्ती :**

दि.०१.१०.२०२१ च्या प्राथमिक नजरअंदाज अहवालानुसार दि.३० ऑगस्ट ते ३० सप्टेंबर, २०२१ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी/ पूरामुळे २४ जिल्हयात ३५,०१,५५५ हे. क्षेत्र बाधित झाले असून यामध्ये ज्वारी, बाजरी, कापूस, तूर, मका, भुईमूग, मूग, उडीद, सोयाबीन, ऊस, कांदा, डाळींब, द्राक्ष, संत्रा, मोसंबी इत्यादी फळपिके व भाजीपाला पिकांचा समावेश आहे.

❖ **किड व रोग :**

राज्यात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, कापूस पिकावर मावा तुडतुडे, गुलाबी बोंड अळी या किडींचा व बोंड सड या रोगाचा, सोयाबीन पिकावर चक्रीभुंगा, उंटअळी, तंबाखूवरील पाने खाणारी अळी, भात पिकावर पिवळी खोडकिड, गादमाशी या किडींचा व करपा, कडा करपा या रोगचा तर भुईमुग पिकावर हुमणी किडीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

किडरोग व्यवस्थापनासाठी क्षेत्रिय स्तरावर शेतीशाळा, कृषि विद्यापीठांकडील पिक संरक्षण सल्ले, सर्वेक्षणासाठी फेरोमेन सापळे व ल्युर्सचा पुरवठा तसेच जैविक किटक नाशकांच्या वापराबाबत सूचना इत्यादी उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच त्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

## खरीप हंगाम सन-२०२१-२२ मधील राज्यस्तरीय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी (दि.०१ ऑक्टोंबर, २०२१ अखेर)




## खरीप हंगाम सन-२०२१-२२ मधील पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता (दि.०१ ऑक्टोंबर, २०२१ अखेर)



# विभाग निहाय पिक परिस्थिती

## कोकण विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पर्जन्यमान** : विभागात दि.०४ ऑक्टोंबर, २०२१ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकुण ४७ तालूक्यांपैकी ८ तालूक्यात ७५ ते १००% तर ३९ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.४२ लाख हेक्टर असून, दि.०१ ऑक्टोंबर, २०२१ अखेर ४.१७ लाख हेक्टर क्षेत्रावर (९४.२७%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती** :
  - भाताच्या हळव्या जाती दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत तर निमगरव्या व गरव्या जाती फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहेत.
  - नाचणी पिक फुलोरा अवस्थेत आहे.
  - पेरणी झालेली कडधान्य व तेलबिया पिके फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहेत.
  - पिक परिस्थिती समाधानकारक आहे.
- **किड व रोग** : विभागात रायगड जिल्हयातील पेण व उरण तालुक्यात, सिंधुदुर्ग जिल्हयातील दोडामार्ग तालुक्यात भात पिकावर पिवळया खोडकिड या किडींचा व कडा करपा या रोगाचा अत्यल्प प्रादुर्भाव दिसून येत आहे.

## नाशिक विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पर्जन्यमान** : विभागात दि.०४ ऑक्टोंबर, २०२१ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकुण ४० तालूक्यांपैकी २ तालूक्यांत २५ ते ५०%, ४ तालूक्यात ५० ते ७५ %, १० तालूक्यात ७५ ते १००% तर २४ तालूक्यात १००% पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २१.१९ लाख हेक्टर असून दि.०१ ऑक्टोंबर, २०२१ अखेर २०.२२ लाख हेक्टर क्षेत्रावर (९५.४३%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती** :
  - भात पिक हळवा भात पक्वतेच्या अवस्थेत, निमगरवा व गरवा भात पिक फुलोरा अवस्थेत आहे.
  - ख.ज्वारी व बाजरी पिके पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे.
  - नागली पिक फुलोरा अवस्थेत आहे.
  - मका पिक कणसांमध्ये दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे.
  - तूर पिक फुलोरा अवस्थेत आहे.
  - मुग, उडीद पिके काढणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.
  - भुईमुग पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत आहेत.
  - कारळा, तीळ व सुर्यफुल पिके फुलोरा अवस्थेत आहेत.
  - सोयाबीन पिक शेंगा पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहेत.
  - कापूस पिक बोंडे पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी वेचणीची कामे सुरु आहेत.
  - आडसाली, पुर्वहंगामी, सुरु व खोडवा ऊस वाढीच्या अवस्थेत आहे. नवीन आडसाली ऊस लागवड पुर्ण झाली आहे.

- मागील सप्ताहातील अतिवृष्टी/ पुरामुळे धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यात, नंदुरबार व जळगाव जिल्ह्यातील सर्व तालुके व नाशिक जिल्ह्यातील नांदगाव, मालेगाव, कळवण, निफाड तालुक्यात पिकांचे नुकसान झाले असुन पंचनाम्याची कामे सुरु आहेत.
- **किड व रोग :** विभागात काही ठिकाणी मका लष्करी अळीचा, कापूस पिकावर मावा तुडतुडे, गुलाबी बोंड अळी, ठिपक्याची बोंड अळी या किडींचा व बोंड सड रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

## पुणे विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पर्जन्यमान** : विभागात दि.०४ ऑक्टोंबर, २०२१ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३९ तालूक्यांपैकी २ तालूक्यात ५० ते ७५%, ८ तालूक्यात ७५ ते १००% तर २९ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.
- **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.६७ लाख हेक्टर असून, दि.०१ ऑक्टोंबर, २०२१ अखेर ११.६३ लाख हेक्टर क्षेत्रावर (१३४.२२%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - भात पिक दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.
  - बाजरी व मका पिकांच्या काढणीची कामे सुरु आहेत.
  - मूग व उडीद पिकांच्या काढणीची कामे पुर्ण झाली आहेत.
  - सोयाबीन पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे सुरु आहेत.
  - भुईमूग पिकाची काढणीची कामे सुरु आहेत.
  - तूर पिक फांदयांना फुटवे फुटणे ते फुलोरा अवस्थेत आहे.
  - ज्वारी पिक पक्वतेच्या अवस्थेत आहे.

**रब्बी हंगाम-२०२१-२२ :**

  - पिकांची काढणी झालेल्या काही ठिकाणी रब्बी हंगामाच्या लागवडीकरीता पुर्वमशागतीची कामे सुरु झाली आहेत. काही ठिकाणी ज्वारी, मका पिकांच्या पेरणीस सुरुवात झाली आहे.
- **किड व रोग :** विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळी या किडीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव दिसून येतो.

## कोल्हापूर विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पर्जन्यमान** : विभागात दि.०४ ऑक्टोंबर, २०२१ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३३ तालूक्यांपैकी ३ तालूक्यात ५० ते ७५%, ८ तालूक्यात ७५ ते १००% तर २२ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.
- **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.०३ लाख हेक्टर असून दि.०१ ऑक्टोंबर, २०२१ अखेर ८.० लाख हेक्टर क्षेत्रावर (९९.६५%) पेरणी झाली आहे.

- **पिक परिस्थिती :**
  - रागी पिक फुटवे फुटणेच्या ते पोटरीच्या अवस्थेत आहे.

- हळवे भात दाणे भरणेच्या अवस्थेत तर निमगरवा व गरवा भात पिक पोटरीच्या ते फुलोरा अवस्थेत आहे.
- सोयाबीन पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे सुरु आहेत.
- ज्वारी पिक पोटरी ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.
- बाजरी पिकाच्या काढणीची कामे प्रगतीपथावर आहे.
- उडीद व मूग पिकांच्या काढणीची कामे पुर्णत्वास आहेत.
- तूर पिक फांदयांना फुटवे फुटणेच्या अवस्थेत आहे.
- मका व भुईमुग पिकांच्या काढणीची कामे सुरु झाली आहेत.
- गत हंगामातील आडसाली, पुर्वहंगामी व सुरु ऊस पिक जोमदार वाढीच्या अवस्थेत आहे. चालु हंगामातील ऊसाच्या लागणीची कामे पुर्ण झाली आहेत. लागवड झालेला ऊस फुटवे फुटणे ते कांडी धरणेच्या अवस्थेत आहे.

❖ **किड व रोग :**

विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, भात पिकावर पिवळी खोडकिड, मावा तुडतुडे या किडीचा व करपा रोगाचा, ऊस पिकावर हुमणी, भुईमुग पिकावर हुमणी या किडींचा अल्पप्रमाणात प्रादुर्भाव दिसून येतो.

## औरंगाबाद विभाग खरीप हंगाम

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

❖ **पर्जन्यमान** : विभागात दि.०४ ऑक्टोंबर, २०२१ अखेरप जंन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण २८ तालूक्यांपैकी २८ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

❖ **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.२३ लाख हेक्टर असून, दि.०१ ऑक्टोंबर, २०२१ अखेर २०.४९ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०१.२७%) पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती :**

- विभागात कापूस पिक पाते, फुले ते बोंडे पोसणेच्या अवस्थेत आहे.
- तूर पिक वाढीच्या ते फुलकळीच्या अवस्थेत आहे.
- बाजरी पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे सुरु आहेत.
- मका पिक कणसांमध्ये दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.
- मूग, उडीद पिकांच्या काढणीची कामे पुर्ण झाली आहेत.
- सोयाबीन पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीची कामे सुरु झाली आहेत.
- भुईमूग पिक पक्वतेच्या अवस्थेत आहे.

❖ मागील सप्ताहात झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिकाचे नुकसान झाले आहे. तसेच पिकाच्या उत्पादन व गुणवत्तेवर परिणाम झाला आहे.

❖ **किड व रोग :**

विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर मुळकुज व बुरशीजन्य रोगाचा, मावा तुडतुडे, गुलाबी बोंड अळी या किडींचा प्रादुर्भाव दिसून येतो.

## लातूर विभाग खरीप हंगाम

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

❖ **पर्जन्यमान** : विभागात दि.०४ ऑक्टोंबर, २०२१ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ४८ तालूक्यांपैकी ४८ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

❖ **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.९४ लाख हेक्टर असून, दि.०१ ऑक्टोंबर, २०२१ अखेर २७.४२ लाख हेक्टर क्षेत्रावर (९८.१५%) पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती :**

- विभागात तूर पिक फुलकळी ते फुले लागणेच्या अवस्थेत आहे.
- मूग व उडीद पिके काढणीची कामे पुर्ण झाली आहेत.
- कापूस पिक पाते ते बोंडे लागणेच्या अवस्थेत आहे.
- सोयाबीन पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीची कामे सुरु आहेत.
- मका पिक कणसे पक्वतेच्या अवस्थेत आहे.
- ज्वारी पिक पक्वतेच्या अवस्थेत आहे.
- बाजरी पिक काढणीची कामे सुरु आहेत.

❖ लातूर विभागात झालेल्या पावसामुळे काढणीला आलेले सोयाबीन, मूग, उडीद पिकांचे नुकसान झाले आहे.

❖ पावसामुळे सोयाबीन पिकास कोंब फुटत आहेत. तसेच काढणी झालेले पिक काळे पडले आहेत.

❖ **किड व रोग :**

विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर मावा तुडतुडे या किडींचा व बोंडे सड या रोगाचा, सोयाबीन पिकावर तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

## अमरावती विभाग खरीप हंगाम

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

❖ **पर्जन्यमान** : विभागात दि.०४ ऑक्टोंबर, २०२१ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ५६ तालूक्यांपैकी २ तालूक्यात ५० ते ७५ %, ५ तालूक्यात ७५ ते १००% तर ४९ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

❖ **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३२.२४ लाख हेक्टर असून, दि.०१ ऑक्टोंबर, २०२१ अखेर ३१.४२ लाख हेक्टर क्षेत्रावर (९७.४६%) पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती :**

- विभागात मूग व उडीद पिकांची काढणीची कामे पुर्ण झाली आहेत.
- सोयाबीन पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे सुरु आहेत.
- कापूस पिक फुले ते बोंडे धरणेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी पक्वतेच्या आहेत.
- तूर पिक शेंडे ते फुलकळी लागणेच्या अवस्थेत आहे.
- मका पिक कणसे लागणे ते कणसांमध्ये दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.
- ज्वारी पिक कणसांमध्ये दाणे भरणेच्या अवस्थेत आहेत.
- भूईमूग पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे सुरु आहेत.

❖ काही तालुक्यात पावसामुळे सोयाबीन पिकास मोड येत आहेत.

❖ अकोला, वाशिम, बुलडाणा, अमरावती जिल्हयात गुलाब चक्रीवादळामुळे झालेल्या अतिवृष्टीमुळे पक्वतेच्या अवस्थेत असलेल्या पिकांच्या गुणवत्तेवर परिणाम झाला असून, पिकांचे नुकसान झाले आहे. सर्वेक्षणाचे काम सुरु आहे.

- **किड व रोग :**

विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर गुलाबी बोंड अळीचा या किडींचा व बोंडे सड या रोगाचा, सोयाबीन पिकावर चक्रीभुंगा या किडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

## नागपूर विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पर्जन्यमान** : विभागात दि.०४ ऑक्टोंबर, २०२१ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ६४ तालूक्यांपैकी २ तालूक्यात ५० ते ७५ %, २२ तालूक्यात ७५ ते १००% तर ४० तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.
- **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.२६ लाख हेक्टर असून, दि.०१ ऑक्टोंबर, २०२१ अखेर १९.४७ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०१.०९%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - विभागात कापूस पिक पात्या ते बोंडे पक्वतेच्या अवस्थेत आहे.
  - तूर पिक फुलकळी लागणेच्या अवस्थेत आहे.
  - भात पिक लोंबी मध्ये दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे.
  - सोयाबीन पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे सुरु आहेत.
- **किड व रोग :**

विभागात भात पिकावर पिवळी खोडकिड, लष्करी अळी, पाने गुंडाळणारी अळी, गादमाशी या किडींचा, करपा व कडा करपा रोगाचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, मावा तुडतुडे किडीचा व बोंड सड या रोगचा प्रादुर्भाव अल्प प्रमाणात दिसून येत आहे.

## महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगामातील मुख्य पिकाखालील दि.०१.१०.२०२१ अखेरचा साप्ताहिक पेरणी अहवाल.

**(क्षेत्र हेक्टरमध्ये)**

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (सन २०१४-१५ ते २०१८-१९) | मागिल वर्षाची पेरणी दि.२८/०९/२०२० | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाच्या क्षेत्राशी टक्केवारी | +/- प्रत्यक्ष पेरणी क्षेत्राची मागिल वर्षाशी तुलना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भात | १४९७४४९ | १५१६८४५ | १५४९२१६ | १०३ | १०२ | २ |
| २ | खरीप ज्वारी | ४८२४६१ | २७४१८५ | २०९१६२ | ४३ | ७६ | -२४ |
| ३ | बाजरी | ६७१५९५ | ६२४२५६ | ५०४४२२ | ७५ | ८१ | -१९ |
| ४ | रागी | ९४७३१ | ६९४१५ | ७३४८७ | ७८ | १०६ | ६ |
| ५ | मका | ८३८०६० | ८९१७६९ | ८७३३९४ | १०४ | ९८ | -२ |
| ६ | इतर तृणधान्य | ५२६६१ | ४१४८२ | ४३६८६ | ८३ | १०५ | ५ |
| **खरीप तृणधान्य** | | **३६३६९५६** | **३४१७९५२** | **३२५३३६६** | **८९** | **९५** | **-५** |
| ७ | तूर | १२७५९७१ | १२३८२०७ | १३३५०३५ | १०५ | १०८ | ८ |
| ८ | मुग | ४८३३४७ | ३९५८४६ | ३७७०१९ | ७८ | ९५ | -५ |
| ९ | उडीद | ३५८९५३ | ३८२२२१ | ४३५८९१ | १२१ | ११४ | १४ |
| १० | इतर कडधान्य | १००३२८ | १२५६८५ | ७८५१० | ७८ | ६२ | -३८ |
| **एकुण कडधान्य** | | **२२१८५९९** | **२१४१९५९** | **२२२६४५६** | **१००** | **१०४** | **४** |
| **एकुण अन्नधान्य** | | **५८५५५५५** | **५५५९९११** | **५४७९८२२** | **९४** | **९९** | **-१** |
| ११ | भुईमुग | १९८४३५ | २०१५९० | २०२६४१ | १०२ | १०१ | १ |
| १२ | तीळ | २३६७२ | ८९१४ | ७५१० | ३२ | ८४ | -१६ |
| १३ | कारळ | १९७२७ | ७८९१ | ६०४८ | ३१ | ७७ | -२३ |
| १४ | सुर्यफुल | १७९६५ | १५०३५ | १२३९६ | ६९ | ८२ | -१८ |
| १५ | सोयाबीन | ३८८४६३३ | ४३४४१२९ | ४६१७१३० | ११९ | १०६ | ६ |
| १६ | इतर गळीतधान्य | १३८३६ | ५६६५ | २९२१ | २१ | ५२ | -४८ |
| **एकुण तेलबिया** | | **४१५८२६८** | **४५८३२२३** | **४८४८६४५** | **११७** | **१०६** | **६** |
| **१७** | **कापूस** | **४१८३८०१** | **४२३९१५२** | **३९५४२१६** | **९५** | **९३** | **-७** |
| **एकुण पेरणी क्षेत्र** | | **१४१९७६२५** | **१४३८२२८६** | **१४२८२६८२** | **१०१** | **९९** | **-१** |
| **१८** | **उस (लागवडीचा)** | **९३५१७९** | **१५९५२५** | **३०७५७०** | **३३** | **१९३** | **९३** |
| **एकुण पेरणी क्षेत्र (ऊसासह)** | | **१५१३२८०४** | **१४५४१८११** | **१४५९०२५२** | **९६** | **१००** | **०** |

टिप- पेरणी क्षेत्र नजर अंदाजीत